Vol 5 Issue 4 Jan 2016

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**




ISSN: 2249-894X    Impact Factor : 3.1402(UIF)    Volume - 5 | Issue - 4 | Jan - 2016





*जिजाभाऊ सिताराम घुले*



# विधान परिषद निवडणुक – स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील निवडणुका –2015
## (सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकिच्या विशेष संदर्भासह)

*जिजाभाऊ सिताराम घुले*
*मुख्याध्यापक, अनुसूचित जाती केंद्रीय निवासी शाळा (माध्य.)*
*एखतपूर, ता.सांगोला जि. सोलापूर.*


### प्रस्तावना

भारताने लोकशाही शासनसंस्थेचा स्विकार करताना संघराज्यात्मक व्यवस्थेचा अंगीकार केला. भारतीय राज्यघटनेत "India that is Bharat shall be union of states" म्हणजे भारत हे संघराज्य नसून राज्यांचा संघ आहे असे वर्णन करण्यात आले आहे. असे असले तरी संघराज्यात्मक व्यवस्थेची लक्षणे आपल्या शासनव्यवस्थेत दिसुन येतात. संघराज्य म्हणजे असे राज्य कि ज्याचे राज्यकारभाराच्या सोईसाठी छोटे छोटे विभाग पाडले जातात. या पद्धतीत दोन पातळयांवर सरकार करण्यात येते.

संघराज्य या शब्दाऐवजी राज्यांचा संघ असे म्हणण्यामागे दोन कारणे आहेत एक म्हणजे भारतीय संघराज्य घटकराज्यांतील कराराने निर्माण झालेले नाही (केंद्रकर्षी- उदा. अमेरिकन संघराज्य) दुसरे म्हणजे या संघराज्यातील घटक राज्यांना संघराज्यातून फुटुन निघण्याचा अधिकार नाही (केंद्रोत्सारी - उदा. रशिया ) भारताचे संघराज्य हे राज्यांचा संघ असून ते अविभंजक आहे. भारत हा एक अखंड देश असुन केवळ राज्यकारभाराच्या व प्रशासकीय सोयीसाठी विविध घटकराज्यांची निर्मिती करण्यात आली आहे.


संघराज्यात्मक व्यवस्थेत केंद्रसरकार व घटक राज्य सरकार अशी दुहेरी शासनव्यवस्था असते व त्यांच्यात अधिकारांची विभागणी करण्यात आलेली असते. संघराज्यात्मक व्यवस्था हि भारतासारख्या खंडप्राय देशाला उपयुक्त ठरते यामुळे विविधतेतून एकात्मता,आर्थिक बचत, एकराष्ट्रियत्वाची जाणीव, लोकशाही शिक्षणाची राजकीय शिक्षण देणारी शाळा आणि केंद्रसरकारवरील कार्याचा ताण यामुळे कमी होण्यास मदत होते.

भारतीय संघराज्य स्वरूप (केंद्र)




घटकराज्ये हा संघराज्याचा एक महत्वपूर्ण भाग आहे. घटकराज्यातील शासनव्यवस्थेची रचना केंद्राच्या शासनव्यवस्थेसारखीच आहे. घटकराज्यांमध्येही संसदीय लोकशाहीचे प्रारूप निर्माण करण्यात आले आहे. तेथेही कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ असते. परंतु केंद्रामध्ये व घटकराज्यामध्ये महत्वाचा जो फरक आहे तो म्हणजे केंद्रामध्ये कायदेमंडळाची दोन सभागृहे (लोकसभा व राज्यसभा) आहेत तर भारतातील काहीच घटकराज्यांमध्ये विधानमंडळाची दोन सभागृहे आहेत. राज्यघटनेच्या भाग टप्पामधील कलम १६८ मध्ये राज्य विधानमंडाळाची तरतूद आहे त्यानुसार राज्यासाठी एक विधानमंडळ असेल आणि ते राज्यपाल व विधानसभा मिळून बनेल,ज्या राज्यांत विधानपरिषद असेल तेथे राज्यपाल, विधानसभा व विधानपरिषद मिळून विधानमंडळ बनेल. सध्या आंध्रप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तरप्रदेश, तेलंगाणा व जम्मू – काश्मिर या घटकराज्यांत द्विगृही विधानमंडळ आहे.

भारतीय संघराज्य स्वरूप(राज्य)




### *विधानपरिषद निर्माण करणे किंवा नष्ट करणे*

राज्यघटनेच्या भाग टप मधील कलम १६९ मध्ये विधापनपरिषदेबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत त्यानुसार
१. राज्यातील विधानपरिषद नष्ट करणे किंवा निर्माण करणे याबाबतचा अधिकार संसदेला आहे व त्यासाठी संसदेने कायदा करण्याची गरज असते.
२. परंतु संसदेने असा कायदा करण्याआधी संबंधित राज्याच्या विधानसभेने तशा स्वरूपाचा ठराव विशेष बहुमताने (एकूण सभासद संख्येच्या बहुमताने व हजर राहून मतदानात भाग घेणाऱ्या सदस्य संख्येच्या २/३ बहुमताने) पारीत करणे आवश्यक असते.म्हणजेच विधान परिषद असावी किंवा नसावी हे ठरविण्याचा अधिकार संबंधित घटक राज्याच्या विधानसभेस आहे.

३. विधानपरिषद (Composition of vidhan parishad and related provisions)

भारतीय राज्यघटनेच्या कलम १७१ मध्ये विधानपरिषदेच्या रचनेसंबंधी तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार – १. विधान परिषदेचे सदस्य अप्रत्यक्षपणे निवडून दिले जातात.
२.विधान परिषदेची सदस्य संख्या किमान ४०(जम्मु काश्मिर वगळून तेथे सदस्य संख्या ३६ आहे ) तर कमाल सदस्य संख्या त्या घटकराज्यातील विधानसभेच्या सदस्य संख्येच्या १/३ इतकी असावी. सध्या घटकराज्यनिहाय विधानपरिषद सदस्यसंख्या – आंध्रप्रदेश ६०,बिहार ७५,जम्मू काश्मिर ३६,कर्नाटक ७५, महाराष्ट्र ७८,उत्तरप्रदेश १०० इतकी आहे.

### *निवडणूक पद्धती* (Manner Of Election)

भारतीय राज्यघटनेच्या कलम १७१(३) मध्ये विधान परिषदेच्या निवडणूकिची पद्धत देण्यात आली आहे. त्यानुसार एकूण सदस्यांपैकी ५/६ सदस्य अप्रत्यक्षपणे निवडून दिले जातील.तर १/६ सदस्य राज्यपालांकडून नामनिर्देशित केले जातील.

### *निर्वाचीत सदस्य –*


विधान परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी ५/६ सदस्य अप्रत्यक्षपणे एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धतीनुसार निवडले जातात यामध्ये मतदार पसंतीक्रम देतात. ज्या उमेदवाराला किमान मतसंख्येएवढी मते मिळतात तो उमेदवार निवडला जातो. मतपत्रिकेवर मत देताना प्रत्येक मतदाराला प्रत्येक उमेदवाराला पसंतीक्रम द्यावा लागतो यालाच क्रमदेय मतदान पध्दती असे म्हणतात.किमान मतसंख्या ठरविण्यासाठी एक सूत्र वापरले जाते.

*सूत्र :–*

$$\text{किमान मते (कोटा)} = \frac{\text{एकूण वैध मते}}{\text{प्रतिनिधी संख्या} + 1} + १$$

### *महाराष्ट्र विधान परिषद*


महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतील सभासदसंख्या ७८ असून सदस्य खालील प्रमाणे निवडले जातात




१).१/३ सदस्य राज्याच्या विधानसभेच्या सदस्यांकडून निवडले जातात. महाराष्ट्राच्या विधानसभा सदस्यांकडून विधानपरिषदेचे ३० सभासद निवडले जातात.
२). १/३ सभासद स्थानिक स्वराज्य संस्थांकडून (राज्यातील जिल्हा परिषदा, नगरपरिषदा व महानगरपालिका सभासदांकडून निवडले जातात. महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेचे २२ सभासद निवडले जातात.
३).१/१२ सदस्य पदवीधर मतदारसंघातून निवडले जातात. भारतातील कोणत्याही विद्यापीठाचे किमान ३ वर्षे पदवीधर असलेल्या व त्या राज्यात निवासी असलेल्या व्यक्तिंकडून निवडून दिले जातात. महाराष्ट्राच्या पदवीधर मतदारसंघातून विधानपरिषदेचे ७ सभासद निवडले जातात.
४).१/१२ सदस्य शिक्षक मतदार संघातून संसदीय कायदयाने निश्चीत केलेल्या माध्यमिक शाळेच्या खालच्या दर्जाच्या नसलेल्या त्या राज्यातील शिक्षण संस्थांमध्ये किमान ३ वर्षे अध्यापनाच्या कामात असलेल्या व्यक्तिंकडून निवडून दिले जातात. महाराष्ट्राच्या शिक्षक मतदारसंघातून विधानपरिषदेचे ७ सभासद निवडले जातात.

### *2. नामनिर्देशित सदस्य* (Nominated Members) :

विधानपरिषदेच्या एकूण सदस्यांपैकि १/६ सदस्य राज्यपालांकडून नामनिर्देशित केले जातात.यात साहित्य,विज्ञान,कला,सहकारी चळवळ व समाजसेवा या क्षेत्रातील विशेष ज्ञान असलेल्या व्यक्तिंना नामनिर्देशित करतात. महाराष्ट्र विधानपरिषदेत १२ सदस्य राज्यपाल नामनिर्देशित करतात.




राज्यपाल नियुक्त आणि मतदारसंघनिहाय महाराष्ट्र विधान परिषद सदस्य संख्या

### *विधानपरिषद कार्यकाल व सभासदांचा कार्यकाल :–*

विधानपरिषद हे राज्यसभेप्रमाणेच स्थायी सभागृह असून ते विसर्जीत होत नाही. १/३ सदस्य दोन वर्षांनी निवृत्त होतात. निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागा भरण्यासाठी दर दोन वर्षांनी निवडणूका घेतल्या जातात किंवा नविन सदस्य नामनिर्देशित केले जातात. विधानसभा सदस्यांचा कार्यकाल सहा वर्षांचा असतो.

### *विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ निवडणूक –2015*

भारतीय निवडणूक आयोग नवी दिल्ली यांनी २४/११/२०१५ रोजी महाराष्ट्र विधान परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था (प्राधिकारी) मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूकीची घोषणा केली त्यानुसार महाराष्ट्रातील मुंबई-२, सोलापूर-१,कोल्हापूर-१, धुळे नंदूरबार-१,अहमदनगर-१, नागपूर-१,बुलढाणा-अकोला-वाशिम-१ अशा एकूण ८ जागांसाठी निवडणूक लढविली गेली. या निवडणूकीत कॉंग्रेस-राष्ट्रवादी यांची आघाडी तर शिवसेना-भाजप यांची युती होती.

विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील ७ जागांसाठीचे निकाल बुधवार दिनोक ३० डिसेंबर २०१५ रोजी जाहिर झाले यात ७ पैकि ३ जागा कॉंग्रेस, शिवसेना २, राष्ट्रवादी १ व भाजप पुरस्कृत १ जागांवर विजय मिळाला तर नागपुरात भाजपचे गिरीश व्यास यांची बिनविरोध निवड झाली.

• ***मुंबई –*** मुंबईतील २ जागांपैकी एका जागेवर पर्यावरण मंत्री रामदास कदम निवडून आले त्यांना ८६ मते मिळाली, तर दुसऱ्या जागेसाठी झालेल्या लढतीत भाई जगताप यांनी शिवसेनेचे रामदास कदम आणि अपक्ष प्रसाद लाड यांच्या मतांमधील दुसऱ्या पसंतीच्या मतांच्या आधारे ६४ मते मिळवून कॉंग्रेसचे भाई जगताप विजयी झाले. भाई जगताप यांनी बंडखोर अपक्ष उमेदवार प्रसाद लाड यांचा दोन मतांनी पराभव केला. कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मतांमध्ये फाटाफूट झाली. भाजपने राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बंडखोर उमेदवाराच्या बाजूने मतदान केले. भाजपा आणि राष्ट्रवादीच्या काही नगरसेवकांच्या पाठिंब्यावर प्रसाद लाड यांनी पहिल्या पसंतीची ५५ मते मिळविली. तरी म.न.से.चे तटस्थ राहणे, राष्ट्रवादीची साथ आणि शिवसेनेने दुसऱ्या पसंतीची मते न देणे या साऱ्या घडामोडी भाई जगताप यांच्या विजयास कारणीभूत ठरल्या. त्यांना पहिल्या पसंतीची ५८ मते व दूसऱ्या पसंतीची ६ मते अशी एकूण ६४ मते मिळून ते विजयी झाले.


• ***कोल्हापूर –*** कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकीय पटलावर २५ वर्ष वर्चस्व राखणारे महादेवराव महाडिक यांचा सतेज पाटील यांनी पराभव केला. महापालिके पाठोपाठ विधानपरिषदेतही पराभव झाल्याने भाजप-महाडिक या नव्या राजकीय समीकरणाला फटका बसला. या निवडणूकीत सतेज पाटील यांनी ६५ मतांनी महाडिक यांचा पराभव केला. महाडिकांच्या सोईच्या राजकारणाला कोल्हापूरकरांनी तडा दिला.

• ***धुळे –*** नंदुरबार - धुळे - नंदुरबार या मतदारसंघात ३८३ वैध मतांपैकी कॉंग्रेसचे अमरीश पटेल यांनी ३५२ मते मिळवली. शिवसेना भाजप युतीचे उमेदवार डॉ शशीकांत वाणी यांना केवळ ३१ मते पडली.

• ***बुलढाणा–*** अकोला-वाशिम - या मतदारसंघात शिवसेनेचे विद्यमान आमदार गोपीकीशन बाजोरीया तिसऱ्यांदा विजयी झाले त्यांनी राष्ट्रवादीचे रवी सपकाळ यांना पराभूत केले. बाजोरीया यांना ५१३ तर सपकाळ यांना २२६ मते मिळाली.

• ***अहमदनगर*** – अहमदनगरमध्ये राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार अरूण जगताप यांनी शिवसेनेचे शशीकांत गाडे यांचा पराभव केला. या निवडणूकीत कॉंग्रेसचे बंडखोर उमेदवार जयंत ससाणे यांनी शेवटच्या टप्प्यात अरूण जगताप यांना पाठिंबा जाहिर केला होता. अरूण जगताप यांना २४४ तर शशीकांत गाडे यांना १७७ मते मिळाली.

• ***नागपूर*** – नागपूरात कॉंग्रेसने ऐनवेळी निवडणूकीच्या रिंगणातुन माघार घेतल्याने भाजपचे गिरीश व्यास बिनविरोध निवडून आले.




महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून २०१५ च्या निवडणूकीत राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा

### *सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक*

सोलापूर जिल्ह्यातील जागा कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या जागावाटपात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वाटयाला आली. या जागेवर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विद्यमान आ. दिपक साळुंखे-पाटील यांना उमेदवारी देण्यात आली तर भाजपने पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रशांत परिचारक यांना पुरस्कृत केले. या निवडणूकीत पक्षीय बलाबल पाहता राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पारडे जड होते.सोलापूर जिल्ह्यातील माढा लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व श्री शरद पवार यांनी केलेले असल्याने जिल्ह्याच्या राजकारणावर शरद पवार यांचा प्रभाव असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेसला या निवडणूकीत यश मिळणे अपेक्षित होते.

### *संस्थानिहाय मतदार संख्या*

महाराष्ट्र विधान परिषद, सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०१५ करिता जिल्हा परिषद सदस्य, सोलापूर महानगरपालिका सदस्य, जिल्ह्यातील करमाळा, कुर्डूवाडी, बार्शी, अक्कलकोट, दुधनी, मैदर्गी, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा या नगर परिषदेचे सदस्य निवडणूकिसाठी मतदार आहेत. स्थानिक प्राधिकारी संस्थेचे संस्थानिहाय मतदारांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क. | स्थानिक प्राधिकारी संस्थेचे नाव | नगरसेवकांची / जि.प. सदस्यांची एकूण संख्या | | एकूण मतदार यादीतील मतदार |
|---|---|---|---|---|
| | | निवडणूकीने | स्विकृत | |
| 1 | अक्कलकोट | 21 | 2 | 23 |
| 2 | दुधनी | 16 | 2 | 18 |
| 3 | बार्शी | 38 | 2 | 40 |
| 4 | पंढरपूर | 33 | 3 | 36 |
| 5 | सांगोला | 18 | 2 | 20 |
| 6 | मंगळवेढा | 17 | 2 | 19 |
| 7 | कुर्डूवाडी | 17 | 2 | 19 |
| 8 | करमाळा | 17 | 2 | 19 |
| 9 | मैदर्गी | 17 | 2 | 19 |
| | एकूण | 194 | 19 | 213 |
| 10 | सो.म.पा. | 102 | 5 | 107 |
| 11 | जि.प. | 67 | 11 | 78 |
| | **एकूण** | **363** | **35** | **398** |

*सोलापूर मतदारसंघ –*

सोलापूर मतदारसंघात कॉंग्रेस राष्ट्रवादी आघडीचे एकहाती वर्चस्व असूनही स्थनिक स्वराज्य मतदारसंघात घोडेबाजारामुळे मतांची फाटाफूट होईल याचा अंदाज आल्याने राष्ट्रवादीच्या नेत्यांनी जातीने लक्ष देऊन दोन्ही पक्षांच्या मतदारांच्या बैठका घेतल्या.

राष्ट्रवादीकडून विद्यमान आमदार दिपक आबा साळुंखे पाटील तर पंढरपूरचे ज्येष्ठ नेते सुधाकर परिचारक यांचे पुतणे प्रशांत परिचारक यांना भाजप ने पुरस्कृत करून उमेदवारी दिली या निवडणूकित स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी लक्ष घातल्याने ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची झाली.

या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी राष्ट्रवादीचे राजन पाटील, रणजीतसिंह मोहिते पाटील तर कॉंग्रेसचे दिलीप माने तसेच संजय शिंदे इच्छुक होते. मात्र पक्षश्रेष्ठिंशी असलेल्या संबंधामुळे उमेदवारी मिळवण्यात दिपक साळुंखे पाटील यशस्वी ठरले. यामुळे राष्ट्रवादी व कॉंग्रेसमधील इच्छुक नाराज झाले. तसेच सोलापूर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणूकीचा प्रभावही या निवडणूकीत जाणवला. जिल्हा बँकेच्या निवडणूकीत दिपक साळुंखे पाटील बिनविरोध निवडून येणार नाहीत याची काळजी विरोधकांनी घेतली त्यामुळे जिल्हा बँकेची निवडणूक प्रक्रिया पार पडेपर्यंत साळुंखे पाटील यांना गुंतवुन ठेवण्यात विरोधक यशस्वी झाले. सुधाकर परिचारक यांची जिल्ह्याच्याच नव्हे तर राज्याच्या राजकारणात असलेली स्वच्छ प्रतिमा,सत्तास्थान हाती असताना केलेला पारदर्शक कारभार जिल्ह्यातील सर्व पक्षीयांशी असलेले सलोख्याचे संबंध याचा फायदा प्रशांत परिचारक यांना झाला. संजय शिंदे यांनी भाजप पुरस्कृत उमेदवार प्रशांत परिचारक यांना मदत केली. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री विजयकुमार देशमुख व आ. सुभाष देशमुख यांनी परिचारक यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले. देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या राजकारणाला बऱ्याच वेळा प्रभावीत करणारी जातीय समीकरणे या निवडणूकीत प्रभावी ठरली नाहीत हे दिसून आले तसेच महाराष्ट्रातील निवडणूकांमधील आर्थिक समीकरणांचा प्रभाव वाढलेला दिसून आला.


त्याचप्रमाणे कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या शह–काटशहाच्या राजकारणाचा परिणाम या निवडणूकीत दिसून आला. मुंबईत राष्ट्रवादीचा बंडखोर रिंगणात असल्याने व भाजप व राष्ट्रवादीचे मुंबईत गुफ्तगु झाल्याने कॉंग्रेसमध्ये त्याची साहजिकच प्रतिक्रीया उमटली सोलापूरमध्ये कॉंग्रेसबरोबरच राष्ट्रवादीच्या मतांमध्ये फाटाफूट झाली. आघाडीसाठी एकिकडे कॉंग्रेसकडे हात पुढे करायचा आणि दुसरीकडे भाजपची साथ घ्यायची हे राजकारण राष्ट्रवादीला सोलापूरमध्ये महाग पडले. त्याचप्रमाणे या निवडणुकीत आर्थिक समिकरणे ही महत्वपूर्ण ठरली. प्रशांत परिचारक यांनी थेट भाजपाच्या चिन्हावर निवडणूक न लढवता अपक्ष राहून निवडणूक लढण्याचा घेतलेला निर्णय त्यांना फायदेशीर ठरला. कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस यांची मते आपल्याकडे वळवण्यात ते यशस्वी झाले. गेल्या विधानसभा निवडणूकीत परिचारक पक्षाबाहेर पडले. प्रशांत परिचारक व माढयाचे राष्ट्रवादीचे आमदार बबन शिंदे यांचे बंधू संजय शिंदे या दोघांनी राष्ट्रवादीविरूद्ध लढत दिली. वास्तविक पाहता आमदार दिपक साळुखे पाटील यांनी आपल्या मतदारसंघात मोठयाप्रमाणावर विकासकामे केली होती व त्याच बळावर निवडणूकीत यश मिळेल असे त्यांना वाटत होते मात्र तसे झाले नाही. या निवडणूकीत केंद्रनिहाय मतमोजणी न करता सर्व मते एकत्र करून मतमोजणी करण्यात आल्याने कोणत्या तालुक्यातून कोणाला किती मते पडली हे समजू शकले नाही.

*केंद्रनिहाय झालेले मतदान–*

दिनांक २७ डिसेंबर २०१५ रोजी मतदान झाले केंद्रनिहाय मतदान खालीलप्रमाणेः-

| मतदान केंद्र | मतदार संख्या | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| करमाळा | 26 | 26 | 100% |
| कुर्डूवाडी | 27 | 27 | 100% |
| बार्शी | 48 | 48 | 100% |
| मोहोळ | 8 | 8 | 100% |
| उ.सोलापूर | 107 | 105 | 98.13% |
| अ.कोट | 67 | 67 | 100% |
| द.सोलापूर | 9 | 9 | 100% |
| पंढरपूर | 45 | 45 | 100% |
| सांगोला | 27 | 27 | 100% |
| माळशिरस | 11 | 11 | 100% |
| मंगळवेढा | 23 | 23 | 100% |
| एकूण | 398 | 396 | 99.50% |

३९८ मतदारांपैकी ३९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. निवडणूकीचा निकाल ३० डिसेंबर २०१५ रोजी लागला या निवडणूकीत प्रशांत परिचारक यांना २६१, दिपक साळुंखे पाटील यांना १२० मते पडली १५ मते बाद झाली.




महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून २०१५ ची निवडणूक झाल्यानंतर विधानपरिषदेतील पक्षीय बलाबल

### निष्कर्ष :–

१. या निवडणूकीत नेते व कार्यकर्ते यांनी पक्षनिष्ठा बाजूला ठेऊन वैयक्तिक हितसंबंध व आर्थिक समीकरणांना महत्व दिले. राजकिय पक्षांची निष्ठा हा विषय गौण मानला गेला.
२. सोलापूर जिल्ह्यात पक्ष ज्याला उमेदवारी देईल त्यांना स्थानिक नेते व कार्यकर्ते निवडुन देण्यासाठी प्रयत्न करत होते. मात्र या निवडणूकित जिल्ह्यातील नेत्यांनी पक्षादेशाऐवजी स्थानिक राजकिय समीकरणांना महत्व दिले.
३. महाराष्ट्रातील कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यातील शह–काटशहाच्या राजकारणाचा परिणाम या निवडणूकीवर झाला. एकमेकांचे उमेदवार पराभूत करण्यासाठी विरोधी उमेदवाराला रसद पुरविली गेली. त्याचा परिणाम सोलापूर मतदारसंघात झाल्याचे दिसून आले.
४. या निवडणूकीला राष्ट्रवादी कॉंग्रेसअंतर्गत निवडणूकिच्या अगोदर घडलेल्या घटना कारणीभूत ठरल्या. आपणास डावलले जात असल्याची भावना राष्ट्रवादीच्या काही नेत्यांमध्ये निर्माण झाली तसेच सोलापूर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणूकीचा प्रभावही जाणवला.
५. या निवडणूकीत एखादया नेत्याचा गट कोणती भूमिका घेतो यावर राजकीय समीकरणे अवलंबून राहिली. पुढील काळात नेत्यांना आपली सत्ता टिकवायची असेल तर कार्यकर्त्यांनाही सत्तेत सहभागी करून घ्यावे लागेल हे स्पष्ट झाले.
६. या निवडणूकीत जातीय समीकरणांपेक्षा आर्थिक समीकरणे प्रभावी ठरली.

### संदर्भ ग्रंथ सूची

१. बंग के.आर. २००५,भारतातील स्थानिक स्वशासन, विशेष संदर्भासह महाराष्ट्र राज्य, मंगेश प्रकाशन नागपूर
२. वाईकर अनंत,२००४, भारतीय शासन संस्था आणि राजकारण (राज्यशास्त्र), निराली प्रकाशन पुणे दुसरी आवृत्ती
३. सिरसिकर व म. २००१, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे
४. भोळे भा.ल. १९९५, भारताचे शासन आणि राजकारण पांचाल प्रकाशन,नागपूर
५. पळशीकर सुहास व नितीन बिरमल,२००४,महाराष्ट्राचे राजकारण, राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे
६. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास,२००७,महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष, राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन,पुणे
७. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास १९९६,महाराष्ट्रातील सत्तांतर,ग्रंथाली प्रकाशन,मुंबई
८. यलमवाड गोविंद २००१, स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन,नांदेड द्वितीय आवृत्ती
९. बिरमल नितीन,१९९९,प्रबळ जातींचा प्रादेशिक पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, समाजप्रबोधन पत्रिका ऑक्टोबर–डिसेंबर
१०. पाटील पी.बी., २००३, भारतीय शासन आणि राजकारण
११. जैन अशोक,२००२, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ पब्लीशर्स, मुंबई दुसरी आवृत्ती
१२. कोळंबे रंजन २०१४, भारताची राज्यघटना आणि प्रशासन भाग १, भगीरथ प्रकाशन, पुणे
१३. मिठबावकर मनिषा, भारतीय संविधान जागरण अभियान
१४. राज्यशास्त्र इयत्ता १२ वी २०१३, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

### वर्तमानपत्रे

दै. लोकसत्ता, दै.लोकमत, दै पुण्यनगरी,दै पुढारी, दै. सकाळ, दै संचार, दै. सांगोला नगरी, दै तरूण भारत, दै माणदूत

एक्सप्रेस, दै. सामना
(दि. २४/११/१५ ते ८/१/१६ या कालावधीतील वर्तमानपत्रात निवडणूकीच्या संदर्भातील बातम्या )

*इलेक्ट्रॉनिक माध्यम*

www.solapur.nic.in
www.maharashtralegislature.org.in/pdf/councilM2014.pdf
www. Eci.nic.in/eci/eci.html
www.103.23.150.139/Affidavits/MLCAffidavits.aspx
https://ceo.maharashtra.gov.in
www.slideshare.net/adsulprashantr/water-quality-mapping-for-solapur-district-using-gis
http://en.wikipedia.org/wiki/outline_of_maharashtra
www.abpmajha.abplive.in
http://www.ibnlokmattv/archives/198109
http://www.loksatta.com/mumbai-news/live-maharashtra-vidhan-parishad-election-result-1180161

**NEWS Channels**

Zee २४ तास , IBN लोकमत, ABP माझा, मी मराठी, जय महाराष्ट्र, TV9 मराठी (दिनांक : २४/११/२०१५ ते ५/१/२०१६ या काळातील निवडणुकीच्या संदर्भात प्रसारीत करण्यात आलेल्या बातम्या )

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org